# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १८/०२/२०२०

### मा. विशेष महासभा

मा. विशेष महासभा सुचना क्र. ०६

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. २६/०२/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. विशेष महासभा दि. २६/०२/२०२०, सभा सुचना क्र. ०६

### विषयपत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ९० | मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैंकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम १९ (२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे "महापौर" पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे. (महापौर पद अनुसूचित जाती करीता आरक्षीत आहे) |
| ९१ | मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैंकी एका सदस्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम १९ (२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे "उपमहापौर" पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०२०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. २६/०२/२०२० रोजी होणाऱ्या महापौर / उपमहापौर पदाच्या निवडणूकीचा कार्यक्रम

| वार व दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|
| सोमवार २४/०२/२०२० | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | महापौर / उपमहापौर पदाचे निवडणूकीसाठी नमुना-१ च्या विहित नमुन्यात नामनिर्देशन पत्रे महानगरपालिका सचिव यांच्याकडे स्वत: दाखल करणे. |
| बुधवार २६/०२/२०२० | सकाळी ११.३० वाजता किंवा सभा सुरु झाल्यापासून | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यावर मा. महापौर पदाच्या निवडणुकीनंतर मा. उपमहापौर पदाच्या निवडणुकीच्या कार्यक्रमास सुरुवात होईल.<br>१) बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे असतील.<br>२) मा. महापौर व मा. उपमहापौर पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३) कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) पिठासीन अधिकारी उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे सदस्यांस वाचून दाखवतील.<br>५) मा. महापौर व मा. उपमहापौर पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास मतांची नोंद हात वर करुन घेण्यात येईल.<br>६) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषित करण्याची कार्यवाही करतील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेद्वाराची यादी तयार करतील. ज्या उमेद्वाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषित करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहूसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८) ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे घोषित करण्यांत येईल. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईदर महानगरपालिका